Maharashtra State Board of Secondary & Higher Secondary Education S.R.No.832-A, Final Plot No. 178,179, Near Balchitrawani, Behind Agharkar Research Institute, Bhamburda, Shivajinagar, Pune-411004.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, स.न.८३२ ए, फा.प्लॉ.नं.१७८, १७९, बालचित्रवाणी शेजारी, आघारकर रिसर्च इन्स्टिट्यूटच्या मागे, भांबुर्डा, शिवाजीनगर, पुणे-४११००४.

Tel : Chairman (P) : STD . (020)-25651751 Secretary (P) : 25651750 । EPABX -25705000 ।
Email : secretary.stateboard@gmail.com

म. रा. मा. उच्च मा. शिक्षण मंडळ
पुणे विभागीय मंडळ
27 JAN 2025
आवक क्रमांक:- 2403

महत्वाचे/परीक्षा प्राधान्य

क्र. रा.मं./परीक्षा-७/312
पुणे - ४११ ००४
दिनांक -23/01/२०२५

प्रति,

विभागीय सचिव,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
सर्व विभागीय मंडळे.

विषय :- फेब्रुवारी - मार्च २०२५ च्या इ. १० वी व इ. १२ वी परीक्षेस आवेदनपत्र सादर केलेल्या विद्यार्थ्यांना शालेय शुल्क न भरणे वा अन्य कारणास्तव शाळा/क.म.कडून प्रवेशपत्र उपलब्ध न होण्याच्या प्रकरणात करावयाच्या कार्यवाहीबाबत.

संदर्भ :- शासनाचे पत्र क्र. संकीर्ण-२०२०/प्र.क्र.३०/एसडी-२ दि. १० मार्च, २०२२.

उपरोक्त विषयास अनुसरून सूचित करण्यात येते की, माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ. १० वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ. १२ वी) फेब्रुवारी - मार्च २०२५ च्या परीक्षेसाठी मंडळाकडे परीक्षा आवेदनपत्र सादर केलेल्या विद्यार्थ्यांना मंडळामार्फत दिलेले प्रवेशपत्र Hallticket संबंधित माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयाचे मुख्याध्यापक/प्राचार्य यांच्यामार्फत वितरीत करण्याबाबत आपणास यापूर्वीच सूचित करण्यात आलेले आहे.

तथापि, विद्यार्थ्यांनी शालेय शुल्क न भरल्यामुळे प्रवेशपत्रासाठी विद्यार्थ्यांची अडवणूक केली जाणे अथवा विद्यार्थ्यांना हॉलतिकीट न देणे ही बाब महाराष्ट्र विधान परिषद अंतर्गत म. वि. प. नियम ९३ अन्वये प्राप्त सूचनेद्वारे उपस्थित करण्यात आली होती. त्यामुळे अशा विद्यार्थ्यांसाठी पर्यायी व्यवस्था निर्माण करण्याबाबत शासनाच्या संदर्भीय पत्रान्वये आदेश प्राप्त झालेले आहेत.

इ. १० वी व इ. १२ वीच्या विद्यार्थ्यांच्या प्रवेशपत्र (Hallticket) वितरणामध्ये उपरोक्तप्रमाणे अडचणी येत असल्यास त्याबाबत पुढीलप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

१. शालेय शुल्क न भरल्याने मंडळाच्या इ. १० वी व इ.१२वी च्या परीक्षेचे प्रवेशपत्र (Hallticket) देण्याबाबत कनिष्ठ महाविद्यालय/शाळांकडून विद्यार्थ्यांची अडवणूक होत असल्यास अथवा त्यांना प्रवेशपत्र प्राप्त होत नसल्यास अशा विद्यार्थ्यांना कनिष्ठ महाविद्यालय/शाळेशी संबंधित तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी अथवा शहरी भागासाठी संबंधित विभागाचे शिक्षण निरीक्षक/शिक्षण उपनिरीक्षक/शिक्षण प्रमुख / शिक्षणाधिकारी /प्रशासन अधिकारी यांचेशी त्वरीत संपर्क साधावा.

२ संबंधित तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी अथवा शहरी भागासाठी संबंधित विभागाचे शिक्षण निरीक्षक/शिक्षण उपनिरीक्षक/शिक्षण प्रमुख / शिक्षणाधिकारी/प्रशासन अधिकारी यांनी सदर विद्यार्थ्यांचे प्रवेशपत्र उपलब्ध करून देण्यासाठी संबंधित विभागीय मंडळाचे विभागीय अध्यक्ष /विभागीय सचिव यांचेशी संपर्क साधावा व अशा विद्यार्थ्यांचा तपशील विभागीय मंडळास तात्काळ उपलब्ध करून द्यावा.

३ संबंधित विभागीय मंडळाचे विभागीय अध्यक्ष /विभागीय सचिव यांनी अशा विद्यार्थ्यांचे प्रवेशपत्र (Hallticket) संगणकयंत्र विभाग, राज्य मंडळ यांचेकडून सॉफ्ट कॉपी स्वरूपात ई मेलद्वारे उपलब्ध करून घ्यावे.

४ सदर सॉफ्ट कॉपी संबंधित तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी अथवा शहरी भागासाठी संबंधित विभागाचे शिक्षण निरीक्षक/शिक्षण उपनिरीक्षक/शिक्षण प्रमुख/शिक्षणाधिकारी/प्रशासन अधिकारी यांना त्यांच्या अधिकृत ई मेल वर उपलब्ध करून द्याव.

→ कृ. मा. प.

५. संबंधित अधिका-यांनी 'सदर सॉफ्ट कॉपीची प्रिंट काढावी व त्यातील माहितीची संबंधित विद्यार्थ्यांकडून खातरजमा करून घ्यावी. अशा योग्य असलेल्या प्रकरणात सदर हॉलतिकीट संबंधित अधिका-यांनी स्वतःच्या सही शिक्क्याने प्रमाणित करून संबंधित विद्यार्थ्यांस द्यावे. सदर प्रमाणीकरणासाठी प्रवेशपत्रावर मुख्याध्यापक यांचेकरीता निर्धारीत केलेली जागा वापरावी.

६ उपरोक्तप्रमाणे सॉफ्ट कॉपीवरून काढलेल्या प्रिंटमधील आशयामध्ये काही बदल असल्यास याबाबत त्वरीत विभागीय अध्यक्ष /विभागीय सचिव यांचेशी संपर्क साधून त्यामध्ये बदल करून घ्यावेत व तदनंतर प्रवेशपत्र (Hallticket) प्रमाणित करून विद्यार्थ्यांस देण्यात यावे.

७ संबंधित तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी अथवा शहरी भागासाठी संबंधित विभागाचे शिक्षण निरीक्षक/शिक्षण उपनिरीक्षक/शिक्षण प्रमुख / शिक्षणाधिकारी/प्रशासन अधिकारी यांनी प्रवेशपत्रासंबंधात उपरोक्तप्रमाणे केलेल्या कार्यवाहीचा कनिष्ठ महाविद्यालय/शाळा व विद्यार्थीनिहाय एकत्रित अहवाल परीक्षा सुरु झाल्यानंतर त्वरीत संबंधित विभागीय अध्यक्ष / विभागीय सचिव यांना लेखी स्वरूपात सादर करावा.

८ उपरोक्त कार्यपध्दतीनुसार प्रवेशपत्र (Hallticket) प्राप्त करून घेतलेल्या विद्यार्थ्यांना परीक्षेस प्रविष्ट करून घेणेबाबत सूचना संबंधित केंद्रसंचालक व उपकेंद्रसंचालक यांना विभागीय मंडळ स्तरावरून देण्यात याव्यात.

९ मंडळाकडे परीक्षा आवेदनपत्र सादर केलेला कोणताही विद्यार्थी परीक्षेपासून वंचित राहणार नाही. याची दक्षता घेणेबाबत सर्व संबंधितांना आवश्यक सूचना निर्गमित कराव्यात.

१० सदर पर्यायी व्यवस्था फक्त फेब्रुवारी - मार्च २०२५ परीक्षेसाठीच उपलब्ध असेल.

तरी उपरोक्त सर्व सूचनांची काटेकोर अंमलबजावणी करून त्याबाबतचा अहवाल राज्य मंडळास स्वतंत्रपणे सादर करण्यात यावा.

(देविदास कुलाळ)
सचिव,
राज्य मंडळ, पुणे ४.

क्र. पुविम/शाखा-३/ 635
पुणे - 411005
दि. 30/1/2025

प्रति,
मुख्याध्यापक,
सर्व माध्यमिक शाळा
सर्व मान्यता प्राप्त शाळा व
उच्च माध्यमिक कनिष्ठ महाविद्यालये
जिल्हा:- पुणे, अहमदनगर, सोलापूर.

उपरोक्त राज्यमंडळाच्या पत्राच्या अनुषंगाने सर्व मान्यता प्राप्त शाळा व उच्च माध्यमिक कनिष्ठ महाविद्यालयांना इ.१० वी व इ.१२ यांना कळवीण्यात येते की, राज्यमंडळ पुणे यांनी सूचीत केल्यानुसार संबंधीत सर्व विद्यार्थ्यांना प्रवेशवपत्र (Hallticket) प्राप्त करण्याबाबत जे निर्देश देण्यात आले आहेत त्यानुसार योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

(औदुंबर उकिरडे)
विभागीय सचिव,
पुणे विभागीय मंडळ, पुणे- ०५.